# ९. सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण
## (Co-operative Education and Training)


९.१ प्रस्तावना
९.२ भारतातील सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा इतिहास
९.३ अर्थ व व्याख्या
९.४ सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे
९.५ सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज / आवश्यकता
९.६ सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची संघटनात्मक रचना
९.६.१ राष्ट्रीय सहकारी महासंघ
९.६.२ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ
९.७ सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या प्रबंधन संस्था
९.७.१ वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था
९.७.२ पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्था
९.७.३ डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्था
९.८ सारांश
९.९ महत्त्वाच्या संज्ञा
९.१० स्वाध्याय


### ९.१ प्रस्तावना :

भारतात सन १९९१ नंतर सरकारने नवीन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. यामुळे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हे मोठ्या प्रमाणावर झाले. या कारणाने सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहकाराचा विकास व प्रगती बाबत आव्हाने निर्माण झाली. व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, साधनसामग्रीचा अभाव, कार्यक्षम व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव व भांडवलाचा अपुरेपणा आणि स्पर्धा या सर्व समस्यांवर परिणामकारक तोडगा म्हणून सहकार शिक्षण व प्रशिक्षण या कार्यक्रमाकडे पाहण्यात येते. यातूनच सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता व गरज भासली. शिक्षण व प्रशिक्षणामुळे कामात अतिउच्च कौशल्य प्राप्त होते शिवाय कामात कार्यक्षमता व उच्च दर्जा प्राप्त होतो.

सहकार ही एक जीवनप्रणाली आहे त्यामुळे सहकाराची तत्त्वे, मूल्ये, व्यवस्थापन, सहकारी संस्थेशी संबंधित व्यक्तीची अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि परस्पर संबंध यातील महत्त्वाच्या गोष्टी इ. ची माहिती सहकार क्षेत्रातील प्रत्येक घटकाला असणे व त्याने ती आचरणात आणणे आवश्यक असते.

### ९.२ भारतातील सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा इतिहास :

भारतात १९१५ साली मॅक्लेगन समितीने सादर केलेल्या आपल्या अहवालात सहकार शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र आपल्या देशात सहकार शिक्षण व प्रशिक्षण प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी 'सहकार सचिव प्रशिक्षण मंडळ' नावाची योजना सर्वप्रथम कै. नामजोशी यांनी सन १९१६ मध्ये मांडली. यामध्ये सहकार कायदा, नियम, कामकाज परिपत्रके याविषयी शिक्षण देण्याची योजना असावी अशी शिफारस केली होती.

सन १९१७ मध्ये झालेल्या प्रांतिक सहकारी परिषदेत एस. एल. तालमाकी यांनी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाविषयी एक निबंध सादर केला. त्याआधारे सन १९१८ मध्ये मुंबई सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट नावाची संस्था स्थापन करण्यात

आली. ही संस्था आता ‘महाराष्ट्र राज्य सहकारी संघ’ या नावाने ओळखली जाते. या प्रांतिक सहकार परिषदेत सहकाराचा नैतिक पाया या विषयावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी निबंध सादर केला. सन १९१८ मध्ये शाही कृषी आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये संस्था संस्थापक, सभासद, संचालक व प्रशासनातील कर्मचारी यांना शिक्षण – प्रशिक्षणाची नितांत गरज असल्याचे म्हटले आहे. यामुळे सभासद व संस्थेच्या संबंधित इतर घटकांना सहकाराची तत्त्वे, कार्यपद्धती व उद्देश समजण्यास मदत होईल व सहकाराची व्याप्ती वाढू शकेल. सन १९३५ च्या माल्कम डार्लिंग यांच्या अध्यक्षतेखाली सहकाराचा आढावा घेण्यासाठी स्थापन झालेल्या समितीने सहकार चळवळीची प्रगती न होण्याचे कारण कर्मचाऱ्यांच्या शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव आहे. असे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सन १९४६ च्या सहकार नियोजन समितीने सहकार तत्त्वाचा विकास होण्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज नोंदविली आहे. सन १९५१ मध्ये श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने १९५४ साली सादर केलेल्या अहवालात सहकाराच्या शिक्षण – प्रशिक्षणाची नितांत गरज आहे असे सांगितले आहे. त्याचबरोबर १९९५ साली सहकाराच्या तत्त्वांची पुर्नरचना यावर विचार करण्याकरिता कॅनडा या देशात आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या सभेत सहकाराची तत्त्वे व मूल्ये निश्चित करण्याबरोबरच सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची नितांत गरज आहे असे जाहीर केले.

### ९.३. सहकार शिक्षण – प्रशिक्षणाचा अर्थ व व्याख्या

सहकार ही एक मानवी सहज प्रवृत्ती आहे. तसेच समाज रचनेचा तो एक मोठा आधार आहे. सहकार चळवळ भक्कम व मजबूत पायावर उभी करण्यासाठी सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी क्रियाशील व जागरूक सभासद वर्ग निर्माण करावा लागतो. याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण मोलाची भूमिका पार पाडते.

**सहकार शिक्षणाचा अर्थ :**

सहकारी तत्त्वे, उद्दिष्टे, पद्धती व व्यवहार यांचे सहकारी संस्थांच्या सभासदांना, संचालकांना, कार्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना ज्ञान देऊन त्यांच्यात सहकारावरील निष्ठा, सहकार्याने कार्य करण्याची प्रवृत्ती व चळवळीच्या विकासाची जिद्द या गुणांचा विकास करण्याची प्रक्रिया म्हणजे सहकार शिक्षण होय.

- **व्याख्या :**

“ सहकार शिक्षण म्हणजे सहकाराशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींना सहकाराची तत्त्वे, पद्धती व उद्देश यांचे ज्ञान देणे होय. तसेच सहकारातील निष्ठा व स्वखुशीने एकत्रित काम करण्याची योग्यता किंवा कुवत इ. गुणांचा विकास करणे होय.”
**– डॉ. कृष्णा स्वामी**

- **सहकार प्रशिक्षणाचा अर्थ**

  एखादे कार्य करण्यासाठी आपली जबाबदारी लक्षात घेऊन ते कार्य पार पाडण्यासाठी लागणारे कौशल्य प्राप्त करणारी परिस्थिती किंवा शिक्षण प्रक्रिया ज्याद्वारे उपलब्ध करून दिले जाते त्यालाच प्रशिक्षण असे म्हणतात.

- **व्याख्या**

“सहकारी संस्थेच्या सेवकाला धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व कार्यालयीन कामे, हिशेब लेखन, इत्यादी स्वरूपाची कामे करावी लागत असल्याने त्याला काम अधिक चांगल्या प्रकारे येण्यासाठी, सहकारातील संबंधित विषयांचे सखोल व प्रात्यक्षिक अशा स्वरूपाचे जे प्रात्यक्षिक शिक्षण दिले जाते त्याला सहकार प्रशिक्षण असे म्हणता येईल.”

“सहकारी क्षेत्रातील कर्मचारी, पदाधिकारी यांच्या कार्यक्षमतेत व गुणवत्तेत उच्चतम वाढ व्हावी. जबाबदारीची भावना निर्माण व्हावी याकरिता कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढीस लावणे व नैतिक मूल्ये यांची जाणीव करून देऊन त्यासाठी आवश्यक ते कौशल्य निर्माण करण्याच्या प्रयत्नाला सहकार प्रशिक्षण असे म्हणतात.”

## ९.४ सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे :

सहकाराशी संबंधित असलेल्या व्यक्तींना सहकाराचा उद्देश, सहकाराची व्याप्ती, सहकाराची कार्यपद्धती, व्यवहार इ. ची माहिती असणे आवश्यक असते. त्याद्वारे त्यांनी एकत्रितपणे नि:स्वार्थी हेतूने काम करण्याची गरज असते. म्हणूनच सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) **सहकाराची संकल्पना पटवून देणे :** सहकारी क्षेत्र हे बऱ्याच लोकांना अपरिचित असल्याने सहकाराची संकल्पना काय असते. त्याची गरज पटवून द्यावी लागते. सहकाराच्या माध्यमातून होणारे फायदे काय आहेत यांची जाणीव लोकांना करून देणे.

२) **लोकांना सहकारी चळवळीकडे आकर्षित करणे :** सहकाराचे महत्त्व लोकांना पटवून देऊन सहकारात लोकांचे हित कसे साध्य करता येईल याची माहिती दिल्यास सहकाराचे महत्त्व त्यांना समजेल. अनिष्ट प्रवृत्तींना बाजूला करण्यासाठी सहकाराच्या तत्त्वानुसार स्वत:चा आणि इतरांचाही फायदा करून घेण्यासाठी लोकांना सहकारी चळवळीकडे आकर्षित करणे.

३) **जबाबदार व जागरूक सभासद तयार करणे :** सहकारी संस्थेचे सभासद जेवढे कार्यक्षम आणि जागरूक असतील तेवढा संस्थेचा कारभार व्यवस्थित कार्यक्षमपणे चालण्यास मदत होते. म्हणूनच असे कार्यक्षम आणि जागरूक सभासद तयार करणे.

४) **सहकारी संस्थेसाठी सक्षम नेतृत्व निर्माण करणे :** सहकारी संस्थेच्या विकासासाठी जबाबदार व सक्षम नेतृत्वाची गरज असते. सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून कल्पकता, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, कार्य करण्याची वृत्ती, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची कला, प्रभावीपणा, धाडस, इत्यादी गुणांची जोपासना करून संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जातो. साहजिकच सहकारी चळवळीचे नेतृत्व जर सभासदांमधूनच घडत गेले तर असे नेतृत्व सहकारी संस्थेला भविष्यकाळात विकासाकडे नेऊ शकते.

५) **संघटित दृष्टिकोन निर्माण करणे :** सभासदांमध्ये एकोपा आणि समानता प्रस्थापित होण्यासाठी सहकारावर निष्ठा निर्माण व्हावी लागते. या कारणाने, समता व एकोपा निर्माण करण्यासाठी लागणारी वैचारिक व मानसिक बैठक तयार होते.

६) **सहकाराची तत्वे, कार्यपद्धती व व्यवहार यांचे ज्ञान देणे :** सहकारी संस्थेच्या माध्यमातून व्यवहार कसे चालतात. त्यामध्ये नैतिकता कशी सांभाळावी, सर्वसामान्य जनतेचे हित कसे साध्य होईल याचे संस्थेशी संबंधित असणाऱ्या सभासद, संचालक, कर्मचारी या सर्वांना ज्ञान देणे.

७) **व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे :** सहकारी संस्था ह्या व्यावसायिक संस्था आहेत. त्यादृष्टिकोनातून व्यावसायिक कौशल्ये विकसित होणे हे सहकार शिक्षण प्रशिक्षणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सहकाराची तत्वे, व्यवहार, कार्यपध्दती याशिवाय अधिकार, जबाबदाऱ्या, कर्तव्ये, नेतृत्व, निर्णयक्षमता, नियोजन, नियंत्रण, समन्वय इत्यादी व्यावसायिक कौशल्यांचा विकास होण्यासाठी सहकारी शिक्षण प्रशिक्षण महत्वाचे ठरते.

८) **भ्रष्टाचार व गैरकारभाराला आळा घालणे :** सहकारी संस्थेचे सभासद, संचालक, अधिकारी व कर्मचारी या सर्वांना प्रामाणिकपणा, चारित्र्य, कर्तव्यदक्षता, व्यवहार्यता इत्यादी गुणांचे महत्त्व पटवून देऊन हे गुण त्यांच्यामध्ये निर्माण करणे हे सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे इतरांच्या विकासाबरोबरच आपला विकास करण्याचा दृष्टिकोन तयार होऊन गैरव्यवहार व भ्रष्टाचारी प्रवृत्तींना आळा बसू शकतो.

९) **प्रशिक्षित सेवक वर्गाची गरज भागविणे :** सहकारी संस्थेचे व्यवस्थापन, प्रशासन व इतर जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी सेवकवर्गाची आवश्यकता असते. हा सेवक वर्ग सहकार शिक्षण प्रशिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध व्हावा ही अपेक्षा

असते. व्यवस्थापकीय, प्रशासकीय कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असेल तर संस्थेचे कामकाज अधिक कार्यक्षमपणे चालविणे शक्य होते.

१०) **सहकारी संस्थांचा निकोप व संतुलित विकास करणे :** सहकारी क्षेत्राचा विकास हा राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात असमान स्वरूपात होतो. त्यातून सहकारी चळवळीमध्ये असंतुलन निर्माण झाले आहे. तसेच गैरप्रवृत्तीमुळेदेखील सहकारी संस्थांच्या विकासात अडचण निर्माण होते. हे टाळण्यासाठी सहकारी संस्थांचा निकोप व संतुलित विकास करणे.

## ९.५ सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज / आवश्यकता :

सहकार शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकार शिक्षण - प्रशिक्षणाची गरज / आवश्यकता पुढील प्रमाणे.

१) **सहकारी चळवळीचे नेतृत्व :** सहकारी संस्थेचे नेतृत्व किती सक्षम आणि कुशल आहे यावर संस्थेचे भवितव्य अवलंबून असते. सहकारी संस्थेवर, तत्त्वावर, मूल्यांवर निष्ठा असणारे, कुशल संघटक असणारे आणि सभासदांच्या, संस्थेच्या विकासाची तळमळ असणारे नेतेच सहकारी संस्थेला विकासाकडे नेऊ शकतात म्हणून नेतृत्व घडविण्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक असते.

२) **सहकारी संस्थेचा विकास :** सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे संस्थेच्या समस्या, त्यावरील उपाय, भावी काळातील आव्हाने, नवनवीन तंत्रज्ञान व कार्यपद्धती यांची माहिती सहकारी संस्थेच्या प्रत्येक घटकाला मिळू शकते व त्या माध्यमातून सहकारी संस्थेचा विकास घडून येतो. म्हणून सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

३) **कार्यक्षम व्यवस्थापन :** सहकारी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना व संचालकांना संस्थेचे कामकाज अधिक चांगल्या रीतीने व कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी लागणारे ज्ञान व कौशल्य सहकार शिक्षण प्रशिक्षणातूनच मिळू शकते. त्यामुळे संस्थेचा कारभार सुव्यवस्थित व कार्यक्षमपणे चालू शकतो.

४) **शिक्षित सभासद वर्गाची निर्मिती :** सहकारी संस्थांचा विकास प्रामुख्याने ग्रामीण भागात झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातील सभासदांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असते. त्यामुळे सहकाराची तत्त्वे, मूल्ये, कार्यपद्धती यांचे ज्ञान त्यांना असेलच असे नाही. शिवाय सहकाराच्या माध्यमातून मिळणारे फायदे देखील त्यांना माहीत नसतात. सभासदांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्ये यांची जाणीव करून देणे आवश्यक असते. म्हणूनच सभासद वर्गामध्ये सहकार शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून परस्पर सहकार्याची व प्रगतीची भावना वाढीस लावण्यासाठी सहकार शिक्षण महत्त्वाचे ठरते.

५) **सहकारावरील विश्वास दृढ करणे :** सर्वसामान्य जनता व सभासद यांच्या मनामध्ये सहकाराची तत्त्वे, मूल्ये, व्यवहार यांची माहिती परिणामकारकपणे रुजवावी लागते. त्यातून सहकारावरील विश्वास दृढ होण्यास मदत होते म्हणून सहकार शिक्षण व प्रशिक्षण गरजेचे असते.

६) **कुशल संघटन :** सहकारी संस्थेच्या संघटनेमध्ये विविध घटक असतात. उदाहरणार्थ, सभासद, संचालक, कार्यकारी संचालक, अध्यक्ष, समिती सदस्य, व्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारी इत्यादी. या सर्वांनाच संस्थेची कार्यपद्धती, त्यांची भूमिका, अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या, संस्थेचे व्यवहार, हिशोब, पत्रव्यवहार, नोंदी, विविध कायदे व त्यातील तरतुदी यांची माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून दिली जाते म्हणून सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज आहे.

७) **सहकारी क्षेत्रास स्वावलंबी बनविणे :** सहकारी संस्था जरी सेवाभावी संस्था असली तरी तिला व्यावसायिक कार्य करावी लागतात. त्यातून उत्पन्न खर्चाची तरतूद करताना शासकीय अनुदान आणि मदतीची अपेक्षा ठेवली जाते. मात्र आर्थिक दृष्टिकोनातून सहकारी संस्था स्वावलंबी आणि अर्थक्षम होण्यासाठी पुरेसे उत्पन्न मिळविण्याची क्षमता या संस्थांमध्ये निर्माण व्हावी लागते. बदलत्या आर्थिक पर्यावरणाकडे सहकारी संस्थांना आपले अस्तित्व टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी सहकारी संस्थेतील सर्व कर्मचारी, अधिकारी, संचालक या सर्वांसाठी सहकार शिक्षण – प्रशिक्षण आवश्यक असते.

८) **भ्रष्टाचार व गैरव्यवहारावर नियंत्रण :** सहकारी संस्थेतील व्यवहारांमध्ये पारदर्शकता निर्माण होण्यासाठी सहकाराची तत्वे, मूल्ये यावर निष्ठा असावी लागते. सहकारी संस्थेचे कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, सभासद यांना त्यांचे महत्त्व व फायदे समजावून द्यावे लागतात. त्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

९) **सहकाराच्या तत्त्वांचा प्रसार :** परस्पर सहकार्य, लोकशाही शिक्षण, सामंजस्य, निष्ठा, प्रामाणिकपणा, धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता, इत्यादी तत्वे सहकाराशी संबंधित असली तरी ती प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात देखील महत्त्वाची असतात. म्हणूनच या तत्वांचा प्रसार व्हावा, ती सर्वसमावेशक व्हावीत यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज असते.

१०) **सभासदांचा प्रभावी व सक्रीय सहभाग :** सहकारात सभासदांच्या वतीने संचालक मंडळ सहकारी संस्थेचा कारभार पाहते. मात्र अनेक सभासद हे आपल्या हक्क कर्तव्यांबाबत जागरुक नसतात. सहकारी संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक सभा, अधिमंडळाच्या विशेष सभेत उपस्थित राहून निर्णयप्रक्रियेत व कामकाजात सहभाग घेतला पाहिजे. यातून सभासदांचा प्रभावी व सक्रीय सहभाग वाढेल. यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

## ९.६ सहकार शिक्षण आणि प्रशिक्षणाची संघटनात्मक रचना :

सहकारातील शिक्षण व प्रशिक्षणाची संघटनात्मक त्रिस्तरीय रचना आहे.

- केंद्रीय पातळी – राष्ट्रीय सहकार महासंघ – वरिष्ठ पातळीवरील शिक्षण प्रशिक्षणाची व्यवस्था.
- राज्य पातळी – महाराष्ट्र राज्य सहकारी संघ – मध्यम पातळीवरील शिक्षण प्रशिक्षण.
- जिल्हा पातळी – जिल्हा सहकार मंडळे – कनिष्ठ पातळीवरील शिक्षण व प्रशिक्षण.

वरील सहकार शिक्षण व प्रशिक्षण व्यवस्थेबाबतची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

### ९.६.१ राष्ट्रीय सहकारी महासंघ : (National Co-operative Union of India)

राष्ट्रीय सहकारी संस्थांचा महासंघ ही भारतातील सहकारी चळवळीतील शिखर संस्था आहे. ही संस्था राष्ट्रीय पातळीवर सहकारी चळवळीचे नेतृत्व करते. सन १९२९ मध्ये ''ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह युनियन इन्स्टिट्युट'' या नावाने ही संस्था स्थापन झाली. सन १९५१ मध्ये या संस्थेचे नाव ''नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन'' असे ठेवण्यात आले. या महासंघाचे कार्यालय दिल्ली येथे आहे. या संस्थेला (IFFCO) ईफको, (KRIBHCO) कृषी भारती व (NAFED) नाफेड यासारख्या संघ संस्थांचे सहकार्य मिळते.

- **कार्ये :**

सहकार चळवळीची वाढ व विकास हा या संस्थेचा प्रमुख हेतू आहे. या राष्ट्रीय सहकारी महासंघाची कार्ये पुढीलप्रमाणे:-

१) सहकारातील वेगवेगळ्या समस्यांवर उपाय शोधून संशोधन प्रकल्प तयार करणे.

२) सहकार शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे.

३) सहकार चळवळीच्या प्रसिद्धीसाठी दृकश्राव्य साहित्य निर्माण करणे.

४) सहकार चळवळीसंबंधी वेगवेगळ्या प्रकाशनातून मासिके, जर्नल, माहितीपत्रके प्रकाशित करून सहकार चळवळीचा प्रचार व प्रसार करणे.

५) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय सहकार चळवळीसंबंधी अधिकृत माहिती व आकडेवारी प्रकाशित करणे.

६) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेतून सहकार चळवळीचे प्रतिनिधित्व करणे.

७) परिसंवाद, चर्चासत्रे, परिषदांचे आयोजन करणे.

८) केंद्र सरकारला सहकार चळवळीसंबंधी निर्णय घेण्यासाठी सल्ला देणे.

या संस्थेच्या कार्याची व्याप्ती मोठी आहे.

**कृती १ : राष्ट्रीय सहकार महासंघाच्या कार्याबाबत आपल्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.**

### ९.६.२ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ : (Maharashtra State Co-operative Union)

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही सहकार प्रशिक्षणातील आद्य संस्था समजली जाते. देशातील ही सर्वात जुनी प्रशिक्षण संस्था आहे. १९०४ साली ब्रिटीश सरकारने भारतातील सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पहिला सहकार कायदा मंजूर केला. पुढे सहकारी संस्थेच्या संख्येत वाढ होऊ लागली. सहकारात आपले हित आणि कल्याण आहे हे समजल्यावर कृषी पतसंस्था मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात सुरू झाल्या. त्यामुळे सहकाराचा प्रसार आणि प्रचाराची आवश्यकता वाटू लागली. याच हेतूने १९१७ मध्ये पुण्यात सहकार परिषद आयोजित केली होती. या परिषदेत राष्ट्रपिता महात्मा गांधींसह देशभरातील सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ, कार्यकर्ते एकत्र आले होते. या परिषदेत महात्मा गांधींनी सहकाराची तत्वे, कार्यपद्धती, सहकार कायदा इत्यादीविषयी लोकांना माहिती देण्यासाठी प्रशिक्षण देण्यावर आग्रह धरला व त्यासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण देणारी संस्था स्थापन करावी असे मत मांडले त्यानुसार सर विठ्ठलदास ठाकरसी, ना. म. जोशी, प्रा. जी. के. देवधर, वैकुंठ मेहता इत्यादी सहकार तज्ज्ञांनी यासंबंधी विचारविनिमय करून १३ जुलै, १९१८ रोजी 'सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट' या संस्थेची पुण्यात स्थापना केली.

या संस्थेचा विस्तार पुढे मोठ्या प्रमाणावर झाला. पुणे, मुंबई, धारवाड, भडोच, कुलाबा, रत्नागिरी, ठाणे, अलिबाग आणि सिंध प्रांतातही शाखा सुरू करण्यात आल्या. १९२६ साली या संस्थेचे '' दि बॉम्बे प्रॉव्हीन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट'' असे नामकरण करण्यात आले. यानंतर १९५२ मध्ये विभागीय सहकार मंडळे, जिल्हा सहकार मंडळे अशी संघीय रचना करण्यात आली. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. १२ एप्रिल, १९६१ पासून ''महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह युनियन'' असे नाव देण्यात आले. जुलै १९६९ पासून ही संस्था ''महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे '' या नावाने ओळखली जाते.

राज्य पातळीवरील सहकारी संस्थेच्या सर्व घटकांना शिक्षण प्रशिक्षण देण्याचे कार्य करणारी एक अग्रेसर संस्था म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. सहकारी चळवळीचा प्रचार व प्रसार राज्यामध्ये करण्यात राज्य सहकारी संघाची भूमिका महत्वाची ठरलेली आहे.

राज्य सहकारी संघामार्फत सहकाराचा प्रसार व प्रचार करण्यासाठी राज्यभर विविध ठिकाणी परिसंवाद, चर्चासत्रे, सहकार परिषदा आयोजित केल्या जातात. दरवर्षी १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत सहकार सप्ताहाचे आयोजन

केले जाते.  सहकार चळवळीचा प्रचार व प्रसारासाठी ''सहकारी महाराष्ट्र'' हे मासिक चालविले जाते. तसेच इंग्रजीमधून '' दि को-ऑपरेटिव्ह'' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने राज्य पातळीवर सहकार शिक्षण व प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे यंत्रणा उभी केली आहे.

**अ) विभागीय सहकार मंडळे :** विभागीय मंडळामार्फत राज्य सहकारी संघ विभागीय पातळीवर सहकार चळवळीतील विविध घटकांना प्रशिक्षण देण्याचे काम करते. विभागीय मंडळामार्फत जिल्हा सहकार मंडळाच्या कामकाजावर देखरेख ठेवली जाते.

**ब) जिल्हा सहकार मंडळे :** जिल्हा पातळीवर या मंडळाचे कार्य चालते. आपल्या राज्यात सर्व जिल्ह्यात सहकारी मंडळे अस्तित्वात आहेत. जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात प्रशिक्षण शिबिरे घेणे, महिला मेळावे भरविणे, सहकार विषयावरील निबंध स्पर्धा ठेवणे. सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांची शिबिरे, सचिवासाठी उजळणी वर्ग इत्यादींचे आयोजन करणे हे जिल्हा मंडळाचे काम असते.

**क) सहकार प्रशिक्षण केंद्रे :** महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या वतीने राज्यात अनेक ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे चालविली जातात. या केंद्रातून सहकार व्यवस्थापन, सहकारी व इतर कायदे, पंचायत राज व सामाजिक विकास, पुस्तपालन, बँकिंग, लेखापरीक्षण अशा विविध विषयांवर चर्चासत्रे व उजळणी वर्ग घेतले जातात.

## ९.७ सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या प्रबंधन संस्था :

### ९.७.१ वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था : (VAMNICOM)

व्यवस्थापन प्रशिक्षणाची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारने १९६४ मध्ये ज्येष्ठ सहकारतज्ज्ञ प्रा. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली.  या समितीने सहकारी संस्थांचा वाढता व्याप व प्रशासन कार्यक्षम करण्यासाठी व्यवस्थापन संस्थेची आवश्यकता अधोरेखित केली.  या सूचनेनुसार 'राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्थेने ' पुण्यात १९६७ साली सहकार शिक्षण -प्रशिक्षण व संशोधन करणारी राष्ट्रीय पातळीवरील संस्था सुरू केली.  सहकार क्षेत्राला ज्यांनी आपले जीवन समर्पित केले त्या स्व. वैकुंठ मेहता यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांचे नाव या संस्थेला दिले.  ही संस्था म्हणजेच ''वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था, पुणे '' होय.

ही संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण, व्यवस्थापन विकास कार्यक्रम, प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, वरिष्ठ अधिकारी प्रशिक्षण कार्यक्रम, सहकार व्यवस्थापन शिक्षण, संशोधन व मार्गदर्शन, महत्वाच्या अहवालांची  प्रसिद्धी, आधुनिक संगणक केंद्र व समृद्ध असे ग्रंथालय चालविणे इत्यादी महत्वाची कामे करत असते. त्याचबरोबर ही संस्था 'को-ऑपरेटिव्ह परस्पेक्टिव्ह' या नावाने त्रैमासिक प्रकाशित करते.  सहकार क्षेत्रातील घडामोडीची समीक्षा करणारे 'को-ऑपरेटर' या नियतकालीकाचे प्रकाशन केले जाते.

**प्रशिक्षण कार्यक्रम :**

या संस्थेतर्फे सहकार व्यवस्थापनातील विविध प्रशिक्षण कार्यक्रम वर्षभर राबविले जातात.  या प्रशिक्षणात व्यवस्थापन, अर्थशास्त्र, ग्रामीण अर्थव्यवस्था, कृषी लेखापरीक्षण, सहकारी कायदे, संगणकीकरण, विपणन, बँकींग, प्रशासन, मानवी संसाधन अशा अभ्यासघटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.  संस्थेमार्फत पुढील विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

१) पदव्युत्तर सहकारी व्यवसाय व्यवस्थापन पदविका कोर्स -(PG Diploma in Co-op. Business Management) २६ आठवडे

२) पदव्युत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदविका कोर्स (PG Diploma in Agricultural Business Management) ५२ आठवडे

3) पदव्युत्तर व्यवस्थापन कोर्स (मुख्य कार्यकारी अधिकारी) (PG Diploma for Management Executies)

४) पदव्युत्तर अभ्यासक्रम (संगणक प्रशिक्षण) ३ महिने

५) साखर कारखान्यातील अधिकाऱ्यांसाठी व्यवसाय प्रशिक्षण कोर्स (Management Programme for Sugar Co-operative)

६) नागरी सहकारी बँका अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग (Management Programme for Bank Officers)

७) आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन

८) सहकारी संस्था आयकर जीएसटी संबंधी प्रशिक्षण वर्ग

९) सहकारी संस्थांच्या सेवकांना माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण (I.T. Training)

१०) नेतृत्व विकास प्रशिक्षण (Leadership Development Training Programme)

### ९.७.२. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्था - (Padmashri Dr. Vitthalrao Vikhe Patil Institute of Co-operative Management) :

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार प्रबंधन संस्था ही देशातील पहिली सहकार प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९४७ मध्ये पुणे येथे झाली. पूर्वी या संस्थेचे नाव 'सहकार प्रशिक्षण महाविद्यालय' असे होते. कालांतराने हे नाव बदलून 'सहकार महर्षी' पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे नाव देण्यात आले. या संस्थेच्या उभारणीत ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ स्व. वैकुंठ मेहता, स्व. डॉ. डी. जी. कर्वे, स्व. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे या संस्थेला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. या संस्थेला केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून अर्थसहाय्य मिळते. संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यवस्थापन समितीचे गठन राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्थेने (NCCT) केले असून त्यात राज्य सरकार व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचा सल्ला घेतला जातो.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्था राज्यातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या अधिकारी, पदाधिकारी यांना प्रशिक्षण देणे. त्यांच्या कार्यक्षमतेत व गुणवत्तेत उच्चतम वाढ व्हावी या उद्देशाने वर्षभर सातत्याने प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम ही संस्था राबवत असते. त्याचप्रमाणे राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांचे मूल्यमापन व संशोधन प्रकल्पाचे काम करते. तसेच सल्ला व मार्गदर्शनाचे कार्यही करते. या संस्थेद्वारे खालील प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

१) सहकार व्यवस्थापन उच्च पदविका अभ्यासक्रम (Higher Diploma in Co-operative Management) २६ आठवडे

२) नागरी सहकारी बँकींग पदविका (Diploma in Urban Co-operative Banking) १२ आठवडे

३) सहकारी लेखापरीक्षण पदविका कोर्स (Diploma Course in Co-operative Audit) १२ आठवडे

४) सहकारी बँकांच्या अध्यक्ष व संचालकांसाठी नेतृत्व विकास कार्यक्रम (Leadership Development Programme for Co-operative Banks Chairman and Directors)

५) सहकारी बँकांच्या महिला अधिकारी वर्गासाठी नेतृत्व विकास कार्यक्रम

६) दुग्धविकास सहकारी समितीच्या पदाधिकाऱ्यांसाठी नेतृत्व विकास शिबिरे - ३ दिवस

७) स्वयंसहाय्यताा समूह जागरूकता शिबीर

८) विविध कार्यकारी सोसायटीच्या संचालकांचा प्रशिक्षण कार्यक्रम

९) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या व्यवस्थापन मंडळ सदस्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम व नेतृत्व विकास कार्यक्रम

१०) ग्राहक सहकारी भांडारांच्या व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम.

### ९.७.३. डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्था : (Dr. Dhananjayrao Gadgil Institute of Co-operative Management)

डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्थेची स्थापना १९७२ साली नागपूर येथे झाली. या संस्थेचा प्रमुख हेतू सहकारी संस्थांत काम करणाऱ्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांपासून ते कनिष्ठ पातळीवरील अधिकारी व इतर सेवक वर्गाला प्रशिक्षण देणे, सहकारातील नव्या बदलाची माहिती सांगणे, त्यांचे कार्यकौशल्य वाढविणे, राज्यशासनाच्या सहकार विभागातील अधिकाऱ्यांना उत्तम दर्जाचे प्रशिक्षण देणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे हा आहे.

या संस्थेवर राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्थेचे (NCCT) नियंत्रण असून केंद्रीय कृषी मंत्रालय व महाराष्ट्र राज्याच्या सहकार विभागाकडून अर्थसहाय्य दिले जाते. सहकार चळवळीला चालना देणे, तिचा विकास करणे, उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करणे, व्यवस्थापकांची निर्णयक्षमता उंचावणे, प्रशासकीय ज्ञान वृद्धिंगत करणे या हेतूने कामे केली जातात. राज्यस्तरावर सहकारी क्षेत्रातील विविध विषयावर कार्यशाळा व परिसंवाद यांचे आयोजन करणे, सहकार व्यवस्थापन, विपणन, संगणकीय माहिती याद्वारे कार्यालयीन व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांना ज्ञान समृद्ध करणे. अशी कामे या संस्थेमार्फत केली जातात. या संस्थेद्वारे खालील उपक्रम राबविले जातात.

१) व्यवस्थापन विकास कार्यक्रम (Management Development Programme) ३ ते १५ दिवस

२) सहकारी व्यवस्थापन उच्चस्तरीय पदविका अभ्यासक्रम (Higher Diploma in Co-operative Management) २६ ते ३६ आठवडे

३) नागरी सहकारी बँक व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम (Diploma in Urban Co-operative Banking Management)

४) मास्टर इन बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन (MBA) २ वर्षे

५) कार्यशाळा

६) संशोधन प्रकल्प

७) राज्यशासन, सहकार विभागाला सल्ला व मार्गदर्शन

**कृती २ : सहकार शिक्षण व प्रशिक्षणामुळे सहकारी संस्थेचे सभासद व कर्मचाऱ्यांमध्ये उच्च कौशल्य कसे प्राप्त होते याबाबत आपल्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.**

## ९.८ सारांश

सन १९१५ सालीच्या मॅक्लेगन समितीने सादर केलेल्या आपल्या अहवालात सहकार शिक्षण प्रशिक्षणाचे महत्व नमूद केले. १९५१ साली श्री. ए. डी. गोरवाला या समितीने देखील शिक्षण प्रशिक्षणाची शिफारस केली.

- **सहकार शिक्षण अर्थ व व्याख्या**
  - अर्थ – सहकारी तत्त्वे, उद्दिष्टे, कार्यपद्धती यांचे सभासदांना ज्ञान देणे.
  - व्याख्या – सहकारावरील निष्ठा आणि एकत्रित काम करण्याची योग्यता निर्माण करणे.

- **सहकार प्रशिक्षण अर्थ व व्याख्या**
  - अर्थ – एखादे कार्य करण्यासाठी लागणारे कौशल्य प्राप्त करणारी परिस्थिती.
  - व्याख्या – सहकारातील संबंधित विषयांचे सखोल व प्रात्यक्षित दिलेले शिक्षण.

- **सहकार शिक्षण प्रशिक्षण उद्दिष्टे :**

  १) सहकाराची संकल्पना पटवून देणे

  २) लोकांना सहकारी चळवळीकडे आकर्षित करणे

  ३) जबाबदार व जागरूक सभासद तयार करणे

  ४) सहकारी संस्थेसाठी सक्षम नेतृत्व निर्माण करणे

  ५) संघटित दृष्टिकोन निर्माण करणे.

  ६) सहकाराची तत्त्वे, कार्यपद्धती व व्यवहार यांचे ज्ञान देणे

  ७) व्यवसायिक कौशल्ये विकसित करणे

  ८) भ्रष्टाचार व गैरकारभाराला आळा घालणे

  ९) प्रशिक्षित सेवक वर्गाची गरज भागविणे.

  १०) सहकारी संस्थांचा निकोप व संतुलित विकास करणे

- **सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज व आवश्यकता :**

  १) सहकारी चळवळीचे नेतृत्व

  २) सहकारी संस्थेचा विकास

  ३) कार्यक्षम व्यवस्थापन

  ४) शिक्षित सभासद वर्गाची निर्मिती

  ५) सहकारावरील विश्वास दृढ करणे

  ६) कुशल संघटन

  ७) सहकारी क्षेत्रास स्वावलंबी बनविणे

  ८) भ्रष्टाचार व गैरव्यवहारावर नियंत्रण

  ९) सहकाराच्या तत्त्वांचा प्रसार

  १०) सभासदांचा प्रभावी व सक्रीय सहभाग

- सहकार शिक्षण प्रशिक्षणाचा आकृतीबंध किंवा रचना

  आपल्या देशात सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था त्रिस्तरीय पातळीवर निर्माण केलेली आहे.

- **राष्ट्रीय सहकार महासंघ**
- **महाराष्ट्र राज्य सहकार संघ**

  अ) विभागीय सहकार मंडळे

  ब) जिल्हा सहकार मंडळे

  क) सहकार प्रशिक्षण केंद्रे
- सहकार शिक्षण - प्रशिक्षण केंद्रे
- वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था
- पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्था
- डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्था

## ९.९ महत्त्वाच्या संज्ञा

१. **सहकार शिक्षण –** सहकाराची तत्वे, पध्दती व उद्देश याचे ज्ञान देणे म्हणजे सहकार शिक्षण होय.

२. **सहकार प्रशिक्षण –** धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, कार्यालयीन कामकाज, हिशेबलेखन इत्यादीचे सखोल व प्रात्यक्षिक स्वरूपांचे शिक्षण म्हणजे सहकार प्रशिक्षण होय.

## ९.१० स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून ................ नेतृत्व निर्माण व्हावे ही अपेक्षा असते.

अ) कुशल ब) अकुशल क) स्वार्थी

२) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था ही ................या ठिकाणी आहे.

अ) नवी दिल्ली ब) पुणे क) नागपूर

३) सहकार शिक्षण व प्रशिक्षण संघटन रचना ................ आहे.

अ) एक स्तरीय ब) द्विस्तरीय क) त्रिस्तरीय

४) भारतात सहकार शिक्षण व प्रशिक्षण प्रसाराचे कार्य करणारी ................ ही शिखर संस्था होय.

अ) राष्ट्रीय सहकारी महासंघ ब) राज्य सहकारी संघ क) जिल्हा सहकार मंडळे

**ब) योग्य जोडया जुळवा.**

| अ गट | ब गट |
|---|---|
| अ) सहकार नियोजन समिती | १) पुणे |
| ब) राष्ट्रीय सहकारी महासंघ | २) मुंबई |
| क) जिल्हा सहकार मंडळे | ३) अमरावती |
| ड) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था | ४) नागपूर |
| ई) डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्था | ५) १९४६ |
| | ६) राज्य पातळी |
| | ७) १९५४ |
| | ८) केंद्रीय पातळी |
| | ९) विभागीय पातळी |
| | १०) जिल्हा पातळी |

**क) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्दसमूह सुचवा.**

१) राष्ट्रीय स्तरावर सहकार शिक्षण प्रशिक्षण संस्थांचे नेतृत्व करणारी सर्वोच्च संस्था.

२) राज्य स्तरावर सहकार शिक्षण प्रशिक्षण संस्थांचे नेतृत्व करणारी संस्था.

३) सहकारी संस्थेशी संबंधित घटकांना सुजाण व शिक्षित करण्याचा मार्ग.

**ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.**

१) भारतात सहकार शिक्षण प्रशिक्षणाची गरज नाही.

२) सहकार शिक्षण प्रशिक्षणामुळे सभासदांमध्ये जागरूकता निर्माण होते.

३) सहकार शिक्षण प्रशिक्षणाने कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते.

४) सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची सभासदांना गरज नसते.

५) भ्रष्टाचार व गैरव्यवहारांना आळा घालणे हा सहकार शिक्षण व प्रशिक्षणाचा उद्‌देश असतो.

६) सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची रचना द्‌विस्तरीय आहे.

७) सहकारी शिक्षण व प्रशिक्षणातून कुशल नेतृत्व निर्माण होते.

८) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था ही राज्य पातळीवर कार्य करणारी संस्था आहे.

**इ) अचूक पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ | |
| २) | डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्था |
| ३) को-ऑपरेटर नियतकालिक | |
| ४) | नवीन आर्थिक धोरण |
| ५) जिल्हा सहकार मंडळे | |

१९९१, नागपूर, राज्य पातळी, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था, जिल्हा पातळी

## फ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सहकारी प्रशिक्षण म्हणजे काय ?

२) सहकारी शिक्षण म्हणजे काय ?

३) डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंधन संस्थेच्या स्थापनेचा प्रमुख हेतू कोणता ?

४) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधन संस्थेच्या स्थापनेचा उद्देश कोणता ?

## ग) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.

१) सहकार शिक्षण प्रशिक्षणाची रचना द्विस्तरीय आहे.

२) जिल्हा सहकार मंडळाचे कार्य राष्ट्रीय पातळीवर चालते.

३) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार प्रबंधन संस्था नागपूर या शहरात आहे.

४) महाराष्ट्र राज्य सहकार संघामार्फत राष्ट्रीय स्तरावर शिक्षण प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध केल्या जातात.

५) डॉ. धनंजयराव गाडगीळ ही प्रबंधन संस्था पुणे या ठिकाणी कार्यरत आहे.

## प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.

१. सहकार शिक्षण     २. सहकार प्रशिक्षण     ३. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ

## प्र.३ उपयोजनावर / स्वमतावर आधारित प्रश्न

१. सहकारी संस्थेतील सभासदांना सहकार शिक्षणाची गरज आहे.

२. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाने संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या कामात उच्च कौशल्य व कार्यक्षमता प्राप्त होते.

## प्र.४ टीपा लिहा.

१. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ.

२. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंधन संस्था.

३. सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज.

## प्र.५ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट करा.

२) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेची माहिती विशद करा.

३) सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची उद्दिष्टे विशद करा.

## प्र.६ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) सहकार शिक्षण व प्रशिक्षण म्हणजे काय हे सांगून, उद्दिष्टे स्पष्ट करा.

२) सहकार शिक्षण व प्रशिक्षणाची गरज/आवश्यकता स्पष्ट करा.